# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे - 401101 दुरध्वनी क्रं. 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## // घनकचरा प्रकल्प विभाग //

जा.क्र.मनपा/घ.प्र.वि./ ०५ /२०२२-२३
दि.१६/०६/२०२२

## कोटेशन सुचना क्र. - ०५ (२०२२-२३)

## // जाहीर कोटेशन सुचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दितील खालील कामांकरीता मोहोरबंद कोटेशन पध्दतीने ऑफलाईन मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि.१६/०६/२०२२ ते दि.२९/०६/२०२२ रोजी पर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या / घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे उपलब्ध होतील.

सदर कामी मागविलेल्या मोहोरबंद कोटेशन दि.३०/०६/२०२२ रोजी दु.१२.०० वाजेपर्यंत घनकचरा प्रकल्प प्रकल्प येथे स्विकारण्यात येतील दि.३०/०६/२०२२ रोजी दु.१५.३० वाजता उपस्थित ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत / अनुपस्थितीत उघडण्यात येतील. कोणतेही कारण न देता एक कोटेशन स्विकारण्याचा अथवा सर्वच कोटेशन नाकारण्याचा हक्क महानगरलिकेने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (GST सहीत) | ईसारा रक्कम | कंत्राटदाराचा वर्ग | निविदा फॉर्म फि | मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी जमा असलेल्या जून्या घनकचऱ्यावर फवारणी करणे कामी Enzyme Conglomerate Powder खरेदी करणे. | रु.९,९०,०००/- | रु.९९९०/- | वर्ग – ६ व त्यावरील | रु.५००/- + रु.९०/- GST रु.५९०/- | ०१ महिना |

सदर कामी कोटेशन आवश्यक असणारा कागदपत्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे. तसेच सदर कामी पात्र होणेकरीता सदरील कागदपत्राची पुर्तता करणे आवश्यक राहील.

- **अटीशर्ती :-**
  १) कोटेशन धारकांनी कार्यालयाकडुन वितरण केलेल्या कोटेशन प्रपत्रावरच दर दिले पाहिजेत, साध्या कागदावर किंवा कंपनीचे लेटरपॅडवर दिलेले दर स्विकारण्यांत येणार नाही.
  २) कोटेशन प्रपत्राच्या प्रत्येक पानावर कोटेशनधारकांनी सही करणे आवश्यक आहे.
  ३) कोणत्याही अटी निविदेत स्विकारण्यात येणार नाही.
  ४) आलेल्या सर्व अथवा कोणतेही कोटेशन अशंत: किंवा पुर्णपणे कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मिरा भाईंदर महानगरपालिका राखुन ठेवीत आहे.
  ५) कोटेशन भरताना कोटेशन अनामत रक्कम Conglomerate powder of microbes of various strains करिता १०,०००/- रु. डिमांड ड्राफ्ट व कोटेशन सोबत लिफाफ्यामध्ये जोडावे.

६) Conglomerate powder of microbes of various strains वितरकामार्फत पुरविली जाणार असल्यास कोटेशन धारकांनी/ उत्पादक कंपनीने वितरकाचे नावं व पत्ता निविदेत नमुद करणे आवश्यक आहे. तसेच वितरकाचा संमती दाखला निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. कोटेशन भरल्यानंतर वितरकाची नेमणुक, वितरकाच्या नेमणुकीत बदल करता येणार नाही.

७) निविदेत नमुद केलेली Conglomerate powder of microbes of various strains संबंधित उत्पादक कंपनी किंवा त्यांचे अधिकृत वितरक यांनीच कोटेशन सादर करावयाच्यां आहेत. कोटेशनकार जर उत्पादक कंपनी/ अधिकृत विक्रेता/ वितरक नसल्यास त्यांची कोटेशन विचारात घेतली जाणार नाही.

८) Conglomerate powder of microbes of various strains ही जीवाणु, कवक, बुरशी आणि किण्वन प्रक्रियेस पुरक असणाऱ्या सुक्ष्म जीवांचे मिश्रण असावे. त्यातील सर्व सुक्ष्मजीव हे नैसर्गिक वातावरणात आढळणारे असावेत व कोणत्याही परिस्थितीत प्रयोग शाळेत तयार केलेले नसावेत आणि जनुकिय दृष्ट्या बदल केलेले नसावेत. तसेच Conglomerate powder of microbes of various strains मध्ये कोणत्याही प्रकारच्या रसायनांचा वापर केलेला नसावा. पर्यावरणास कोणत्याही स्वरुपात हानी पोहचवणारे नसावे. तसेच त्यातले सुक्षम जीव थंड (mesophilic) व उष्ण (thermophilic) वातावरणात काम करु शकणारे असावेत.

९) वरील प्रमाणे स्व प्रमाणपत्र आणि वापरलेल्या सुक्ष्म जीवांचे विवरण वितरकाने देणे आवश्यक आहे.

१०) सोबत दिलेल्या कोटेशन पत्रकात अंदाजित परिणाम दिलेले आहे. त्यापेक्षा जास्त किंवा कमी परिमाणाची मागणी मंजुर निविदेतील दररोज करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे व तो कोटेशनकारक बंधनकारक राहील. मंजुर दर २०१९-२० च्या आर्थिक वर्षासाठी राहतील. आवश्यकता असल्यास कोटेशन कालावधी वाढविला जाईल. वाढीव कालावधीत मंजुर दराने पुरवठा कोटेशनकारास करावा लागेल.

११) कोटेशन भरतांना प्रत्येक बाबीचे दर सर्व कर (उदा. अकबरी दर, विक्री दर, जी.एस.टी. किंवा कोटेशन भरतांना लागु असलेले इतर कर इ.) धरुनच व इतर खर्च (उदा. वाहतुक, पॅकिंग इ.) यासह भरण्यास यावे. पुरवठा आदेशात नमुद केलेल्या Conglomerate powder of microbes of various strains कार्यादेशांत नमुद केलेल्या ठिकाणी स्वखर्चाने पुरवठा करावा लागेल.

१२) पुरवठा दराने स्वखर्चाने रु.२०/- च्या स्टॅम्पपेपरवर १-१ प्रतीत करारनामा कोटेशन मंजुरीचे पत्राच्या दिनांका पासुन १५ दिवसांच्या आत करुन घ्यावा लागेल, पुरवठादारांनी तसे न केल्यास किंवा करारनामा नकार दिल्यास कोणतेही पुर्व सुचना न देता त्यांची कोटेशन रद्द करण्यात येईल व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१३) मंजुर निविदेतील किंवा कोणतेही बाबतीत काहीही वाद निर्माण झाल्यास कार्यकारी अभियंता यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. तसेच कायदेशीर कारवाई उभय बाजुची झाल्यास उभय बाजुच्या खर्चाची संपुर्ण जबाबदारी पुरवठादारांवर राहील. कनिष्ठ व जिल्हा न्यायालयासाठी ठाणे जिल्हा व उच्च न्यायालयासाठी मुंबई उच्च हे क्षेत्र कायदेशीर दाव्यासाठी बंधणनकारक राहील.

१४) Conglomerate powder of microbes of various strains पुरवठा कार्यादेश मिळाल्या पासुन ३० दिवसांच्या आत कोटेशनकारांना करावा लागेल. कोटेशनकारास योग्य कारणाशिवाय व पुरवठा आदेशाची मुदत संपण्यापुर्वी अर्ज केल्याशिवाय मुदतवाढीचा विचार केला जाणार नाही.

१५) विहित मुदत पुरवठा न झाल्यास प्रतीदिन खालीलप्रमाणे देय किंवा अनामत रक्कमेतुन दंड वसुल करण्यात येईल.

१६) कोटेशन दोन लिफाफा पध्दतीने सादर करण्यात याव्यात.

१७) कल्चर पुरवठा व फवारणी करण्याचा महानगरपालिकेतील अनुभव असणे आवश्यक आहे.

**ठिकाण** : भाईंदर (प.)
**दिनांक** :१६/०६/२०२२

(शरद नानेगांवकर)
**कार्यकारी अभियंता (घ.प्र.वि.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे - 401101 दुरध्वनी क्रं. 28192828

## // घनकचरा प्रकल्प विभाग //

**जा.क्र.मनपा/घ.प्र.वि./०५/२०२२-२३**
**दि.१६/०६/२०२२**

प्रति,
सिस्टिम मॅनेजर
संगणक विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :- कोटेशन संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत...**
**संदर्भ :- कोटेशन क्र. ०५ (२०२२-२३)**

उपरोक्त विषयान्वये घनकचरा प्रकल्प विभागामार्फत **उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी जमा असलेल्या जून्या घनकचऱ्यावर फवारणी करणे कामी Enzyme Conglomerate Powder खरेदी करणे** या कामाचे कोटेशन काढण्यात आलेले आहे. सोबत जोडलेले कोटेशन मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता (घ.प्र.वि.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\2022-23\2. S. Nanegaonkar\1. Ghan kachara Prakalp\TENDER\1. Quotation\1. कोटेशन\Quotation - 05 - Conglomerate Powder.docx